Review of Research Journal
Vol.1,Issue.V/Feb; 12pp.1-4 **प्रा. कदम संभाजी धोंडीराम** **ISSN:- 2249-894X**

ORIGINAL ARTICLE

‘‘आंतरर्वुळ बहिर्वर्तुळ सिद्धांत आणि मराठी भाषेचा पुनर्विचार’’

प्रा. कदम संभाजी धोंडीराम
बाबासाहेब चितळे महा. भिलवडी. जि.सांगली.

प्रस्तावना :–

मराठी भाषा ही आर्य भारतीय भाषा कुलातील सर्वात जुनी भाषा आहे.तिच्यादक्षिणेला वापूर्वेला लगत असणाऱ्या भाषा म्हणजे अनुक्रमे कानडी, तेलगू, तमिळ, मल्याळम् या द्रविडी भाषाहोत.होर्न्ले –ग्रिअर्सन यांनी आंतरर्वुळ बहिर्वर्तुळ सिद्धांत मांडला आहे. त्यांच्या मते मराठी ही बहिर्वर्तुळातील भाषा ठरते. मराठी भाषा ही आर्य लोक व मराठी भाषिक प्रदेशातील मूळचे द्रविड लोक व करोल (निषाद)यांच्या संकरातून झालेल्या लोकांची (ीलइतपक चवचनसंजपवद)भाषा होय.

आर्यांचे भारतात आगमन कधी झाले असावे हे नक्की सांगता येत नसले तरी इ. स. पूर्व सुमारे १५०० च्या सुमारास आर्यांचे भारतवर्षात आगमन झाले असे मानले जाते. आर्य भारतात येण्यापूर्वी प्राटो ऑस्ट्रोलॉईड व द्रविड निग्रिटो पंथीय लोक स्थिर झाले होते. तीन वंशापैकी द्रविडांची संस्कृती पुढारलेली होती. त्यानंतर आर्यांचे आगमन भारतात झाले. परंतू ते किती टोळ्यांनी आणि कशा रितीने आले याबद्दल एकमत नाही.याबाबत होर्न्ले यांनी एक सिद्धांत मांडला तोच बहिर्वर्तुळ सिद्धांत होय.

होर्न्ले यांच्या मते आर्य भारतात दोन टोळ्यांनी आले. प्रथम आलेले आर्य गंगेच्या पश्चिम दुआबात वसाहत करुन होते. परंतू त्यांच्या नंतर आलेल्या आर्यांच्या टोळीने प्रथम आलेल्या आर्यांच्या टोळीला हाकलून दिले. व स्वत: पश्चिम दुआबात स्थिर झाले तेच आंतरवर्तुळ होय. प्रथम आलेल्या आर्यांनी आपल्या बळावर द्रविडांना मूळ ठिकाणावरुन हुसकावून लावले व द्रविडांच्या ठिकाणी ते स्थिरावले. त्यानंतर दुसऱ्या आर्यांच्या अटोळीने प्रथम आलेल्या आर्य टोळीवर हल्ला करुन त्यांना हुसकावून लावले. तेंव्हा प्रथम आलेल्या आर्यांनी द्रविडीचा आश्रय घेतला. आणि त्यांच्यासमवेत राहू लागले.प्रथम आलेल्या आर्यांच्या बोलीपासून म्हणजे जिला ‘होर्न्ले पूर्वेची मागधी बोली’ म्हणतात. तिच्यापासून लोंढी, सींधी, मराठी, ओरीया, बिहारी, बंगाली व आसामी या भाषा निर्माण झाल्या. तर आंतर्वर्तुळातील भाषा शौरसेनी, प्राकृत, अर्वाचिन पश्चिम हिंदी होती. आधुनिक आर्यभारतीय भाषा ह्या मूळ आर्यभारतीय भाषेच्या निरनिराळ्या अवस्थापासून उत्क्रांत होत गेल्या आहेत.

रिस्ले या मानव वंश शास्त्राच्या मते प्रथम आलेल्या आर्यांनी आपल्या स्त्रियांना आपल्या बरोबर आणले होते. नंतर आलेल्या आर्यानी आपल्या स्त्रिया आपल्या बरोबर आणल्या नाहीत. साहजिक ते कृष्णवर्णीय द्रविडांच्या प्रदेशात मध्यप्रदेशात ते राहिले. त्यांचे द्रविडांच्या स्त्रियांबरोबर शारीरिक संबंध आले म्हणून द्रविडांच्या स्त्रियांना त्यांनी पत्करले. पण काही अभ्यासकांच्या मते कोणत्याही द्रविडांनी आपल्याबरोबर स्त्रिया आणल्या नाहीत. वर म्हटल्याप्रमाणे त्यांनी द्रविडांच्या स्त्रियांचा स्विकार केला. त्यामुळेच कदाचित आर्यांच्या मूळ बोलीवर द्रविडांच्या भाषेचा परिणाम होऊन भाषिक परिवर्तन झाले असावे. भारतात आर्यांचे आगमन त्यांच्या वेगवेगळ्यां जातीच्यास, वर्णांच्या टोळ्यां आल्या असाव्यात असा तर्क केला जातो.

त्याावरुन असे लक्षात येते की, रानटी जंगलात असणाऱ्या आर्यांची भाषा ही शुद्ध असणार नाही याचा अर्थ असा की, आर्यांची एक भाषा नव्हती, अनेक होत्या याचा परिणाम मूळ भारतीय भाषांवर झाला असावा.

प्राचीन वेदकाळापासून उत्तर हिंदुस्थ आर्यांच्या दोन वसाहतीत विभागला होता. एक पश्चिमेकडील वैदिक आर्यांची व दुसरी पूर्वेकडील अवैदिक आर्यांची. पश्चिमेकडील आर्यांच्या वेदात आढळणारी भाषा ही 'प्रमाण' मानली वैदिक संस्कृती निर्मिती व जोपासना झाली. हाच तो पंजाबच्या उदीचा देश. येथेच पाणिनीने अष्टाध्यायी लिहून वैदिक मंत्राना शुद्ध राखून उदीच्या बोलभाषेला संस्कृत बनविले. ही आंतर्वर्तुळातील भाषेची स्थिती होती.

प्राचीन वेदकाळापासून उत्तर हिंदुस्थानात आर्यवंश दोन वसाहतीत विभागलेला होता. एक पश्चिमेकडील वैदिक आर्यांची व दुसरी पूर्वेकडील आर्यांची. वेद समकालीन संकलित संपादित झाले ते पश्चिमेकडील आर्यांकडूनच हीच प्रमाण भाषा होय. वैदिक संस्कृतीची निर्मिती व जोपासना झाली. तिही या आर्यांच्या वसाहतीत; पण पूर्वेकडील आंतर्वर्तुळाच्या भोवतालच्या प्रदेशातील आर्य अवैदिक होते. त्यांची भाषा दार्दिक होती. ग्रिअर्सनच्या मते या आर्यांची वस्ती पंजाब, सिंध, गुजरात, राजपुताना, मराठी प्रदेश, पूर्व हिंदीचा मुलुख, बिहार (त्यांची भाषा बंगाल, आसाम व ओरीसा येथे पसरली) आणि उत्तरेला हिमालयाच्या पायथ्याचे प्रदेश येथे पसरली. उदीच्या भाषेभोवतीचे हेच ते बाह्यवर्तुळ होय. आणि वर्तुळातील आर्यभाषेपासून उत्क्रांत झालेल्या भाषा म्हणजे लोंढी, सिंधी, गुजराती, मराठी, पूर्व हिंदी, बिहारी, बंगाली, आसामी, ओरीसा आणि पहाडी भाषा आहेत. यांच्याकडे मध्यप्रदेशातील वैदिक आर्य भाषेपासून उत्क्रांत झालेल्या पश्चिम हिंदीभोवती पडलेले आहे.

ग्रिअर्सन यांनी ही विभागणी मध्यप्रदेशीय शौरसेनी व प्राच्य मागधी या प्राकृत भाषांच्या विभागाशीही बरीच मिळती जुळती आहे.असेमत मांडले आहे. वरील मताचे कारण असे की, होर्न्ले शौरसेनीबरोबर महाराष्ट्रीचा समावेश करतात.आणि वरवर पहाता ती शौरसेनीला जवळचीही वाटते. कारण संस्कृत नाटकातून जी पात्रे गद्यात शौरसेनी बोलतात, तीच पात्रे पद्यात महाराष्ट्री वापरतात.

महाराष्ट्री ही मागधीपेक्षा शौरसेनीला जवळची वाटते. परंतु ती शौरसेनीहून अनेक बाबतीत वेगळीही आहे. तसेच ती अनेक बाबतीत मागधीशीही साम्य दाखविते. खरे हेच की, महाराष्ट्री ही सर्वच आर्यावर्तात काव्याची भाषा म्हणून महत्त्व पावलेली व महत्त्व प्राप्त झालेली भाषा होती. हिचा संचार प्राकृत भाषिकात होत असल्यामुळे तिचे गुणधर्म प्राकृतांनी उचलले असणे शक्य आहे. त्यामुळेच प्राकृतातील अनेक लकबी त्यात उतरल्या असण्याची शक्यता आहे.

शौरसेनी ही पश्चिमेची भाषा म्हणजे, त्यावेळच्या मध्यप्रदेशातील भाषा होय. तर मागधी ही पुर्वेची भाषा म्हणजे सध्याच्या दक्षिण बिहार प्रदेशाची तेंव्हाची भाषा या दोघींच्यामध्ये सारखेपणा दाखविणारी भाषा म्हणजे अर्धमागधी भाषा होय. या अर्धमागधीला अधिक जवळची पण पूर्वेच्या मागधीकडे झुकणारी भाषा म्हणजे आजच्या विदर्भातील तेंव्हाची भाषा महाराष्ट्री ही होय.

ग्रिअर्सन यांनी प्राकृत भाषांची व त्यांच्या अपभ्रशांपासून निर्माण झालेल्या भाषांची विभागणी खालील प्रमाणे.

ग्रिअर्सन यांची भाषा विभागणी



आंतर्वर्तुळ—बहिर्वर्तुळातील आर्यभारतीय भाषांचे प्राकृतीक फरक मूळ प्रत्ययी आर्य भाषांचा विकास होत होता. आज आंतर्वर्तुळातील पश्चिम हिंदीही मुख्यत: अप्रत्ययी बनलेली आहे. परंतु बहिर्वर्तुळातील भाषा ह्या आपले अप्रत्ययी रुप पुन्हा थोड्याफार नव्या रितीने प्रत्ययी बनू पहात आहेत. अर्थात बऱ्याच नाम रुपांच्या बाबतीत

त्या अजून अप्रत्ययीच आहेत हे खरे. पण आख्यातांच्या बातीत मात्र त्या प्रत्ययी बनलेल्या आहेत.

आर्यभारतीय भाषांची भाषिक साम्यभेदांने केलेली वर्गवारी सारांश रुपाने खालील प्रमाणे मांडता येईल.

आर्यभारतीय भाषांचा भाषिक साम्यभेद



आंतरवर्तुळ—बहिर्वर्तुळातील सिद्धांत मांडताना होर्न्ले—ग्रिअर्सन,चंदा,सुनितकुमार चअर्जी, स्टेन कौनो रिस्ले यांनी आपापल्या पद्धतीने निष्कर्ष काढले आहेत. त्यांची मांडणी आणि मते सुद्धा जुळत नाहीत.तरीही आंतरवर्तुळ—बहिर्वर्तुळातील सिद्धांताचा विचार करताना असे लक्षात येते की,आर्य आणि आर्येत्तरलोकांचे मिश्रण भारतात आलेल्या आर्यांच्या निरनिराळया बोलीभाषा, एकमेकोवर आधारलेल्या प्रमाण वैदिक भाषा ग्रांथिक भाषा ह्या ऋग्वेदातील भाषेशी जुळतात. ऋग्वेदातील प्रमाण वैदिक बोलीच्या खुणा सापडतात. पण ऋग्वेदात ग्रांथिक झालेल्या वैदिक बोलीप्रमाणे त्याकाळी इतरही वैदिक बोली असल्या पाहिजेत. त्यापैकी असलेल्या काही बोलीत 'ड' चा उच्चार 'ळ' होई. गुरु हा शब्द एका बोलीभाषेत 'गुरु' होतो; तर दुसऱ्या बोलीत 'गरु' होतो. पाली व नंतरच्या प्राकृतातही 'गरु' असाच उच्चार आढळतो. ऋग्वेद व वैदिक भाषांचा विचार करता असे लक्षात येते की, वैदिक भाषेत अनेक बोली होत्या.

आंतरवर्तुळ—बहिर्वर्तुळातील भाषांचा अभ्यास होर्न्ले—ग्रिअर्सन, स्टेन कौनो यांनी केला आहे. यामध्ये आर्यांच्या आगमनापूर्वी व आगमनानंतर भाषेच बाबतीत अनेक मते दिसून येतात. बहिर्वर्तुळाची मांडणी एकमेकांना मान्य होत नाही असेही दिसते.त्यामुळे या सिद्धांतांला, मांडणीला भाषाशास्त्रामध्ये अभ्यास करताना प्रत्येक वेळी वेगवेगळे निष्कर्ष प्राप्त होण्याची शक्यता असते. या सर्वांत मराठी भाषेची अवस्था वेगळी आहे. एके ठिकाणी ग्रिअर्सन आपले मत मांडताना म्हणतात, '' भाषांची वर्गवारी सैल आहे. नव्हे थोडी भोंगळही आहे.'' यावरून असे लक्षात येते की, ग्रिअर्सन यांची भाषांची वर्गवारी सैल आहे असे ते ठामपणे म्हणत नाहीत आणि भोंगळही म्हणत नाहीत. कारण अर्वाचिन आर्यभारतीय भाषांच्या परस्पर साम्य भेदाइतकी गुंतागुंत आहे की, त्यात भाषांची स्थाने काटेकोरपणे ठरविणे मुस्किल आहे. पण स्टेन कौनो यांना मुख्यत: मराठीचा विचार करावयाचा असल्याने त्यांनी मराठी व बहिर्वर्तुळातील भाषा यांचे परस्पर संबंध निश्चित करण्यावर आपले लक्ष्य केंद्रित केले आहे.

मराठीचे एकंदरीत रूप पाहिले तर ती काहीबाबतीत आंतरकुलातील भाषांशी जुळते आहे. तर काही बाबतीत ती या दोन्ही कुलातील भाषांहून पार वेगळी पडते. आणि म्हणून केवळ मराठीचा एक खास वेगळा गट मानावा लागतो. ह्या होर्न्ले यांच्या सिद्धांताचा उल्लेख करुन त्याचाच जणू कौनो यांनी अनुवाद केलेला दिसतो.

मराठी भाषा वर म्हटल्याप्रमाणे आंतरवर्तुळ—बहिर्वर्तुळाशी साम्य साधते हे पाहण्यासाठी या दोन्हीशी असणारे मराठीचे काही विशेष थोडक्यात खालील प्रमाणे.

- **आंतरवर्तुळातील भाषांशी साम्य असणारे मराठीचे विशेष**

१) **उच्चार** — १) 'व' आणि 'ब' या दोन्ही व्यंजनांचे अस्तित्त्व (गुजराथी, पंजाबी, सिंधी व काही प्रमाणत राजस्थानी यात ही प्रवृती दिसते.)

२) 'अ'चा ऱ्हस्व उच्चार (इंग्रजी छनज मधिल न प्रमाणे)

३) 'स' चे उच्चार होत असले तरी मराठी 'श' हा उच्चार बंगाली 'श' हून वेगळा आहे

४) तालव्य 'च' व 'ज' यांचा दन्त तालव्यासारखा उच्चार मराठीत तालव्य व दन्ततालव्य हे दोन्ही उच्चार आहेत.

२) दर्शक व संबंधी सर्वनामे प्रथमेच्या एकवचनात 'ओ' कारांत होतात. पूर्वेकडील भाषांत ती 'ए' कारांत होतात. उदा. मराठी 'शे' बिहारी 'जे'

३) जुन्या मराठीत 'अ' कारांत पुल्लींग नामांच्या प्रथमेच्या एकवचनी रूपे 'उ' कारांन्त व 'ओ' कारांन्त होतात.

४) सकर्मक क्रियापदाच्या भूतकालासाठी कर्मणी प्रयोगाची योजना .

५) **'न' प्रत्ययान्त धातुसाधित** (पश्चिम हिंदीप्रमाणे).

- **बहिर्वर्तुळातील भाषांशी साम्य दाखविणारे मराठीचे अवशेष**

१) 'आ' कारांन्त सामान्य रूप

उदा. बाप : बाप्पा : (चा) मराठी
बापा : (स) मराठी
प्रहर : प्रहारा बिहारी

२) भूतकाळाचा 'ल' प्रत्यय हा 'ल' प्रत्यय मुलतः भुतकालवाचक कर्मणी धातूसाधितांना लागतो.

वरील सर्व गाष्टींचा विचार करता असे लक्षात येते की, आंतर्वर्तुळ बहिर्वर्तुळातील भाषा, त्यांचे उच्चार, नामे, सर्वनामे, विभक्ती इतर बाह्य भाषा यामध्ये फरक जाणवतो. म्हणून आंतर्वर्तुळ बहिर्वर्तुळातील भाषा व मराठी भाषा यांचा पुनर्विचार आणि पुनर्मांडणी महत्त्वाची वाटते. कारण मराठीचे मूळ शोधताना ते आर्यपूर्व भाषा इंडो युरोपियन पासून आजच्या मराठीपर्यंत शोधताना अनेक स्थित्यंतरे दिसून येतात. प्रत्येक भाषेतील शब्द मराठीमध्ये आले आणि मूळची मराठी भ्रष्ट झाली. आजच्या मराठीचा विचार करता असे दिसून येते की, प्रदेशाप्रमाणे मराठी भाषेचे शब्दोच्चार बदलतात.सीमावर्त भागांत नेमकी मराठी की, सीमा भागाच्या पलीकडील भाषा हेच ओळखणे कठीण झाले. आजच्या आधूनिक युगात वाढत्या प्रसार माध्यामंमुळे अनेक भाषा ऐकायला मिळतात. त्यामुळे आजचा मराठी भाषिक असेल वा मराठी भाषेत्तर भाषिक असेल एकावेळी तो किती आहे आणि तो कोणत्या भाषांचा वापर एका वाक्यात करतो हे सांगता येत नाही. मराठी भाषा टिकवायची असेल तर मराठी भाषेच्या व्याकरणापासून मराठी भाषा, विज्ञान भाषा, वैज्ञानिकांच्या मतासह पुन्हा तपासली पाहिजे. शुद्ध मराठी टिकवायची असेल तर मराठीच्या पुर्नमांडणीचा विचार मराठी भाषा निर्मितीचा विचार पुर्नविचार मांडता येवू शकेल .

वरील प्रमाणे मराठी भाषेच विकास कसकसा होत गेला त्यावर एक नजर टाकता येवू शकेल.

- **संदर्भ :**

१) ग्रामोपाध्याय गं. बा.— व्हिनस पब्लिसिंग हाऊस, पुणे १ डिसेंबर १९७२.
२) कुलकर्णी कृ.पा. — मराठी भाषा : उद्गम आणि विकास १९५४
३) गजेंद्र गडकर श्री. न.— भाषा आणि भाषाशास्त्र व्हिनस प्रकाशन पुणे व्दितीय आवृती
४) मालसे स. ग.,इनामदार हे. वि., सोमन अंजली (संपादक) — भाषा विज्ञान वर्णनात्मक आणि ऐतिहासीक संजय प्रकाशन पुणे ४ प्रथमावृत्ती २६ जानेवारी १९८२.